महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
सहसंचालक, लेखा व कोषागारे,
"लेखा कोष भवन", जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,
सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१.
दुरध्वनी क्रमांक :- ०७१२-२५६००२१/ २५६१०२३ ईमेल :- jd-nagpur@mah.gov.in


क्र./न.क्र./आस्था-३/ कनिष्ठ लेखापाल -भरती प्रक्रिया/1246 /२०२५/ दिनांक : 27 MAY 2025

प्रति,

सहसंचालक (संगणक/सुधारणा),
संचालनालय, लेखा व कोषागारे
म. रा. मुंबई

विषय :- कनिष्ठ लेखापाल भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने दिनांक १७.०४.२०२५ रोजी दोन शिफ्टमध्ये घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेच्या उत्तर तालिकेची लिंक संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग नागपूर या विभागाची कनिष्ठ लेखापाल या पदाची परिक्षा दिनांक १७.०४.२०२५ रोजी दोन शिफ्टमध्ये ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आलेली असून टिसीएसद्वारे उत्तरतालिकेची लिंक या कार्यालयास पुरविण्यात आलेली आहे. तरी सदर लिंक व त्यानुषंगाने आक्षेप नोंदविण्यास्तव सुचनापत्रक संचालनालयाच्या https://mahakosh.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर दि. २७.०५.२०२५ रोजी प्रसिध्द करावी. सदर लिंक ही दि. २७.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपासून ते दि. ३०.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० पर्यंत कार्यान्वीत राहील. ही विनंती.

सहपत्र - सूचनापत्रक

(ज्योती भोंडे)
सहसंचालक,
लेखा व कोषागारे, नागपूर

**सूचनापत्र**

**जाहिरात क्र.०१/२०२४, दि. ०७.०१.२०२५ चे अनुषंगाने**

**उत्तर तालिका (Answer key) व हरकत अर्जाबाबत सूचना.**

सहसंचालक लेखा व कोषागारे, नागपूर विभाग नागपूर च्या आस्थापनेवरील गट-क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी वर्तमानपत्रात **क्र. ०१/२०२४, दिनांक ०७.०१.२०२५ अन्वये** प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार अर्ज केलेल्या अर्हताधारक उमेदवारांची ऑनलाईन परिक्षा दिनांक १७.०४.२०२५ रोजी दोन शिफ्टमध्ये घेण्यात आलेली आहे.

कनिष्ठ लेखापाल या पदांच्या उत्तर तालिकेची लिंक (Answer key Link) https://mahakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर Careers या मेन्यूमध्ये दिनांक २७.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपासून ते दिनांक ३०.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे. उमेदवारांनी वरीलप्रमाणे लिंकवर अर्ज क्रमांक (Application No.) व ऑनलाईन अर्ज भरतेवेळी वापरलेला पासवर्ड (Password) वापरुन उत्तरतालिका (Answer key) तपासून घ्यावी तसेच (Objection Form) live करण्यात येत आहे.

कनिष्ठ लेखापाल या पदांच्या ऑनलाईन परिक्षेचे प्रश्न अथवा उत्तराबाबत उमेदवारांच्या हरकती/आक्षेप असल्यास दिनांक २७.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपासून ते दिनांक ३०.०५.२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत योग्य त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह उत्तरतालिकेसोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या हरकत अर्जात पाठविण्यात याव्यात. प्रत्येकी एका हरकत/आक्षेपाकरीता रु. १०० शुल्क आकारण्यात येत आहेत. सदरचे शुल्क उमेदवाराने UPI, इंटरनेट बँकीग, क्रेडीट कार्ड किंवा डेबीट कार्डद्वारे भरावे. विहित मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती/आक्षेप यांची दखल घेतली जाणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सहसंचालक,
लेखा व कोषागारे,
नागपूर